अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार, दि. ३ ऑक्टोबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ५ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## बुधवारी शटडाऊन; शहराला उशिरा कमी वेळ, कमी दाबाने पाणीपुरवठा

सुराज्य/सोलापूर

वीज वितरण कंपनी कडून शटडाऊन घेण्यात येणार असल्याने भवानी पेठ जलशुध्दीकरण केंद्र येथून पाण्याचा उपसा कमी होणार आहे. त्यामुळे भवानी पेठ जलशुध्दीकरण केंद्र येथून होणारा पाणी पुरवठा उशिरा कमी वेळ, कमी दाबाने होणार आहे.

महापालिका पाणी पुरवठा विभागाकडील भवानी पेठ जलशुध्दीकरण केंद्र येथील ३३ केव्ही लाईनवरील मेन्टन्स कामाकरीता बुधवार दि. ४ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी १० ते दुपारी ५ वाजता या कालावधीसाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी कडून शटडाऊन घेण्यात येणार आहे.

यामुळे भवानी पेठ जलशुध्दीकरण केंद्र येथून पाण्याचा उपसा कमी होणार असल्याने भवानी पेठ जलशुध्दीकरण केंद्र येथून होणारा पाणी पुरवठा उशिरा कमी वेळ, कमी दाबाने होणार आहे. तरी नागरीकानी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करुन महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका सार्वजनिक आरोग्य अभियंता विजयकुमार राठोड यांनी केले आहे.

# मृत्यूचे तांडव!

# औषधांचा अभाव; २४ रुग्णांचा जीव गेला

## मृतांत १२ नवजात बालकांचा समावेश

## नांदेडच्या सरकारी रुग्णालयातील धक्कादायक प्रकार

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**महाराष्ट्राने सोमवारी पुन्हा मृत्यूचे तांडव पाहिले. नांदेडच्या सरकारी रुग्णालयात वेळीच औषधे न मिळाल्याने २४ रुग्णांचा मृत्यू झाला. धक्कादायक प्रसंग म्हणजे २४ तासात अत्यवस्थेतील २४ रुग्णांना जीव सोडावा लागला. मन विषण्ण करणारा प्रकार म्हणजे त्यात १२ नवजात बालकांनी जगाचा निरोप घेतला. मेडिसीन प्रॉडक्टमधील 'हाफकिन' कंपनीने औषधी खरेदीचा गोंधळ घातल्यानंतर राज्यभरातील शासकीय रुग्णालयांमध्ये औषधींचा प्रचंड तुटवडा जाणवत आहे. अत्यवस्थ रुग्णांनाही वेळेत औषधी न मिळाल्याने जीव गमवावा लागण्याची वेळ येत आहे. असाच काहीसा धक्कादायक प्रकार नांदेडच्या डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात घडला. गेल्या २४ तासांत रुग्णालयात दर तासाला एक म्हणजेच २४ रुग्णांचा मृत्यू झाला.त्यात गंभीर बाब म्हणजे मृतांमध्ये १२ नवजात बालकांचा समावेश आहे. त्यामुळे साऱ्या राज्यात खळबळ माजली आहे.ठाण्यात एका रात्रीत १८ रुग्ण दगावले होते.त्यानंतर राज्याच्या दृष्टीने महायुतीचे सरकार व आरोग्य खाते सतर्क व्हायला हवे होते मात्र नांदेडमधील या घटनेने आरोग्य खात्याची लक्तरे वेशीवर परत एकदा टांगली गेली आहेत.**

'हाफकिन'ने औषधी खरेदी करून न दिल्याने गोरगरिबांचा मोठा आधार असलेल्या शासकीय रुग्णालयांना औषधींचा पुरवठाच करण्यात आला नाही. त्यामुळे राज्यभरातील रुग्णालयांमध्ये सध्या औषधींचा प्रचंड तुटवडा जाणवत आहे.

नांदेडच्या डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाची दररोजची ओपीडी साधारणत: दोन हजारांवर आहे. या ठिकाणी नांदेडसह हिंगोली, परभणी, यवतमाळ, वाशिम अन् शेजारील तेलंगणा राज्यातून मोठ्या प्रमाणात रुग्ण येतात. रुग्णांची संख्या वाढत असताना औषधींच्या तुटवड्याचा विषयही गंभीर होत चालला आहे.

आजही रुग्णांना बाहेरून औषधी आणण्याचा सल्ला दिला जातो. त्यातच गेल्या २४ तासांत रुग्णालयात २४ जणांचा मृत्यू झाला असून, त्यात ६ पुरुष आणि ६ स्त्रीजातीच्या नवजात बालकांचा समावेश आहे; परंतु रुग्णालय प्रशासन मात्र अत्यवस्थ असलेल्या अन् शेवटच्या क्षणी रेफर रुग्णांचा मयतामध्ये समावेश असल्याचा दावा करीत आहे.




### आरोग्य संचालकांची समिती करणार चौकशी

आरोग्य विभागाच्या हलगर्जीपणामुळे नवजात बालकं दगावल्याचा आरोप होत आहे. या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी केली आहे. या घटनेची दखल घेत राज्यातील आरोग्य संचालकाची एक समिती गठित करण्यात आली आहे. चौकशीसाठी समितीचे सदस्य आज मंगळवारी रुग्णालयाला भेट देणार आहे, अशी माहिती रुग्णालय प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

### विदारक स्थिती

बेड संख्या कमी आणि रुग्णाची संख्या दुप्पट असताना देखील रुग्णालय प्रशासन झोपेत असल्याचे दिसून येत आहे. ५०० खाटांच्या रुग्णालयात १२०० रुग्ण उपचार घेत आहेत. सद्या रुग्णालयात ७० रुग्ण अत्यंत सिरियस आहेत. जवळपास ५०० खाटांचं हे रुग्णालय आहे. मात्र सद्यस्थितीला रुग्णालयात १२०० रुग्ण उपचार घेत आहेत. त्यातही ७० रुग्ण अत्यवस्थ आहेत. एका बेडवर दोन रुग्णांना झोपावं लागतंय. जास्त गर्दी असेल तर जमिनीवर झोपूनही रुग्ण उपचार घेतायेत. सिटी स्कॅन, मशीन एक्स रे मशीन यासह इतर आवश्यक असलेले तपासणी मशीन बंद असल्याची माहिती आहे. रुग्ण संख्या जास्त असूनही आरोग्य यंत्रणा गाफिल आहे. आजच्या २४ जणांच्या मृत्यूला जबाबदार कोण असा प्रश्न आता नांदेडचे नागरिक विचारतायेत.

### खरेदी तांत्रिक मान्यतेत अडकली

जिल्हा नियोजन समितीकडून रुग्णालयासाठी ४ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यातील १ कोटीची यंत्रसामग्री, १ कोटीची औषधी खरेदी, १ कोटी शस्त्रक्रियेसाठी लागणारे साहित्य आणि उर्वरित १ कोटी ऑक्सिजन फ्लॅटसाठी ठेवण्यात आले आहेत; परंतु चार कोटींच्या प्रस्तावाला अद्याप तांत्रिक मान्यता मिळाली नाही. त्यामुळे १ कोटींची औषधी खरेदी रखडल्याचे सांगण्यात येते.

### एक्स्पायरी डेट संपतेय, द्या पाठवून

रुग्णालयात अत्यावश्यक औषधी नसल्यामुळे शेजारील जिल्ह्याच्या रुग्णालयात एक्स्पायरी डेट संपत असलेल्या औषधींचा साठा गरज पडल्यास मागवून घेण्यात येत आहे. नेत्यांच्या वाढदिवशी औषधी भेट देण्याचे आवाहन करण्यात येत आहे. रुग्णालय प्रशासनाने खरेदी केलेल्या ४० लाखांच्या औषधींचा साठा संपत आला आहे.

### मयतांमध्ये रेफर रुग्ण अधिक

रुग्णालयात शेजारील चार ते पाच जिल्ह्यांतून रुग्ण येतात. अनेकजण खासगी रुग्णालयात उपचार घेतात. पैसे संपल्यानंतर शेवटच्या क्षणी ते शासकीय रुग्णालयात येतात. आलेल्या प्रत्येक रुग्णाला आम्ही दाखल करून घेतो. त्यामुळे मृत्यूचा आकडा मोठा दिसतो. औषधींचा तुटवडा आहे; परंतु औषधी नसल्याने रुग्णाचा जीव गेला असे म्हणता येणार नाही. लवकरच 'डीपीडीसी'च्या निधीतून औषधी खरेदी करण्यात येणार आहे.

**-डॉ. एस. आर. बाकोडे, अधिष्ठाता**

## विदेशी बनावटीचे पिस्टल विकणारा गजाआड

### दोन पिस्टलसह पाच जिवंत काडतुसे हस्तगत

सुराज्य/सोलापूर

विदेशी बनावटीचे पिस्टल विक्रीच्या उद्देशाने आलेल्या संशयितास गजाआड करण्यात एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकास यश आले. रविवारी पहाटे ही कामगिरी पार पडली असून सुनील लक्ष्मीकांत अकोले असे त्याचे नाव आहे. त्याच्या ताब्यातून २ पिस्टल आणि पाच जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आली. त्याची सरकारी किंमत २ लाख १० हजार रुपयाहून अधिक असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजन माने यांनी सांगितले.

एमआयडीसीपोलीसठाण्याच्या हद्दीत पाणी टाकीजवळ एक तरुण विदेश बनावटीची पिस्टल विक्रीसाठी येणार असल्याची खबर एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकास मिळाली होती,त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक विक्रम राजपूत यांनी सापळा लावून हाती पिशवी घेऊन चालत आलेल्या तरुणास पकडले. त्याच्याकडून २ विदेशी बनावटीचे पिस्टल जप्त करण्यात आले. त्याच्याजवळ पाच जिवंत काडतुसे मिळून आली. त्याच्याकडे अधिक चौकशी करता सुनील लक्ष्मीकांत अकोले (वय-३०, रा. एमआयडीसी ) असे असल्याचे निष्पन्न झाले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजन माने यांनी पत्रकारांशी बोलताना ही माहिती दिली. पोहेकॉ.राकेश पाटील यांना मिळालेल्या माहितीनुसार, त्या तरुणास सुनील नगर पाण्याच्या टाकीजवळ शिताफीने पकडण्यात यश आले. ही कामगिरी पोलीस उप-निरीक्षक विक्रम रजपुत, पोहेकॉ राकेश पाटील,नाना उबाळे, दीपक डोके,सचिन भांगे,मंगेश गायकवाड,पोकॉ. सुहास अर्जुन, शंकर याळगी,काशीनाथ वाघे, दीपक नारायणकर, शैलेश स्वामी, अमोल यादव,अमर शिवसिंगवाले, आमसिध्द निंबाळ,देवीदास कदम,भारतसिंग तुक्कुवाले यांनी पार पाडली.




### हव्यास अंगलट आला...

संशयित आरोपी सुनील लक्ष्मीकांत अकोले हा पोलीस रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध चोरी,घरफोडी-जबरी चोरीचे १३ गुन्हे दाखल आहेत.त्याने अधिक पैसा मिळवण्याच्या उद्देशाने हा मार्ग निवडला,असे प्राथमिक चौकशीत पुढे आले आहे. त्याने ही पिस्टल पुणे जिल्ह्यात खरेदी करून विक्री करण्याच्या उद्देशाने सोलापुरात आणली होती. या गुन्ह्याच्या अधिक तपासाच्या अनुषंगाने ज्या गोष्टी पुढे आले आहेत,त्याची वाच्छता अधिक तपासाला बाधा आणणारी असल्याने त्याचा उकल करता येत नसल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक माने यांनी सांगितले.

## हॉटेल चालकास कोयत्याचा धाक दाखवून रोकड लुटली

### पंढरपुरात तिघांवर दरोड्याचा गुन्हा

सुराज्य/सोलापूर

हॉटेलमध्ये जेवणास येऊन हॉटेलच्या मालकासह तिघांना मारहाण आणि कोयत्याचा धाक दाखवून ड्राव्हरमधील रोकड लुटल्याची घटना पंढरपूर येथील मार्केट यार्ड जवळ असलेल्या अहिल्या हॉटेल येथे शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणात पंढरपूर शहरच्या पोलिसांनी तिघांविरुद्ध दरोडा आणि शस्त्र अधिनियमाचा गुन्हा दाखल केला आहे.

अण्णा गोपाळ दांडगे (रा. डोंबेगल्ली पंढरपूर), बाळा किशोर संदिले आणि गुंजले नावाचा इसम (रा.पंढरपूर) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत.

या संदर्भात अहिल्या हॉटेलचे चालक निलेश नवनाथ खरात (वय २२ रा. पंढरपूर) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. ते शनिवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास आपल्या हॉटेलमध्ये बसले होते. त्यावेळी अण्णा दांडगे यांच्यासह तिघांनी हॉटेलमध्ये जेवणाकरिता आले होते. त्यापैकी दांडगे याने खरात यांना पाचशे रुपयाची मागणी केली. पैसे नाही असे सांगितल्यानंतर तिघांनी त्यांना आणि त्यांचे भाऊजी चंद्रकांत मिटकरी तसेच वडील नवनाथ खरात यांना लाथाबुक्क्याने मारहाण केली . त्यावेळी दांडगे याने निलेश खरात यांच्या गळयास कोयता लावला. आणि ठार मारण्याची धमकी देत ड्राव्हर मधील ४ हजार ५०० रुपये तर त्यांच्या भावजीच्या खिशातील १ हजार६०० रुपये असे एकूण ६ हजार १०० रुपये लुटून पोबारा केला. पुढील तपास फौजदार भागवत करीत आहेत.

## कंटेनरच्या धडकेने उत्तर प्रदेशचा इसम ठार

**सोलापूर :** करमाळा येथील बस स्थानकाजवळ वेगाने जाणाऱ्या कंटेनरच्या धडकेने ४५ वर्षीय पादचारी इसम गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडला. बिरामन आत्मज गुप्ता (वय ४५ रा.उ. प्रदेश, सध्या रा.शेलगाव ता.करमाळा) असे मयताचे नाव आहे. ते शुक्रवारी रात्री सात वाजेच्या सुमारास करमाळा ते टेंभूर्णी रोडवरचा रस्ता ओलांडात होते. त्यावेळी एनएल०१-एजी-१०७० या क्रमांकाचा कंटेनर धडकून तसाच पुढे गेला. त्यात ते गंभीर जखमी होऊन मरण पावले. या प्रकरणात करमाळ्याच्या पोलिसांनी अपघातानंतर पसार झालेला कंटेनर चालक अजीमोद्दीन कय्युममियाँ (रा. झारखंड)याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. पुढील तपास फौजदार जगताप करीत आहेत.

## विवाहित इसमाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर :** एका ३९ वर्षीय विवाहित इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना न्यू पाच्छापेठ परिसरातील खड्डा तालीम जवळ रविवारी रात्रीच्या सुमारास घडली.

यशवंत रंगा पवार (वय ३९ रा.खड्डा तालीम जवळ) असे मयताचे नाव आहे. रविवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास तो जेवण करून वरच्या मजल्यावर झोपण्यासाठी गेला होता. आणि छताच्या पंख्याला साडीने गळफास घेतला. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर त्याला फासातून सोडवून शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मात्र तो उपचारापूर्वी मयत झाला. मयत यशवंत पवार यांच्या पश्चात पत्नी,१ मुलगा आणि १ मुलगी असा परिवार आहे. या घटनेची नोंद जेलरोड पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार माने पुढील तपास करीत आहेत.

## दौंडमधून विसर्ग थोडा घटला; उजनी प्लसमध्ये ५४.२६ टक्के



सुराज्य/सोलापूर

उजनी धरणात दौंडमधून येणारा विसर्ग सोमवारी सायंकाळपासून थोडा मंदावला असला तरी पाण्याची आवक बऱ्यापैकी आहे.त्यामुळे येत्या दोन-तीन दिवसात धरण ५० टक्के भरण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.धरणातील पाण्याची पातळी प्लसमध्ये ४५.२६टक्के झाली आहे.

दौंडमधून रविवारी ३६ हजार क्युसेक्सचा विसर्ग धरणात येवून मिसळत होता.सोमवारी सायंकाळी तो २९ हजार ८५० इतका झाला आहे. पुणे जिल्ह्यात आणि उजनीच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस कमी जास्त होत आहे. त्यामुळे दौंडमधील विसर्गही कमी जास्त होतो आहे तरी देखील खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग कायम आहे.

खडकवासला धरणसाखळी प्रकल्पातील चारही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस सुरू असल्याने शुक्रवारी रात्रीपासून खडकवासला धरणातून मुठा नदीत पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. शनिवार सायंकाळी पाच वाजल्यापासून या धरणातून मुठा नदीत २ हजार १४० क्युसेक वेगाने सोडण्यात येत असलेले पाणी रविवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत कायम ठेवण्यात आले होते.या पाण्याचा लाभ उजनीला होतो आहे.दरम्यान निरा खोऱ्यात जोरदार पर्जन्यवृष्टी झाल्याने त्याचा फायदा भीमा नदीला होवू शकतो.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आज तुझ्या भविष्यात धनलाभ आहे!

| कल्याण |
| --- |
| 114-68-170 |

| मुंबई |
| --- |
| 279-83-580 |

# निवडणूक लोकसभेची; परीक्षा मात्र भाजपच्या आमदारांची

## आपापल्या मतदारसंघातून मताधिक्य द्यावे लागणार

सुराज्य/अजित उंब्रजकर

भाजपने आता सर्वप्रथम पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांना पंतप्रधानपदी बसवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी २०१४ आणि २०१९ प्रमाणे महाराष्ट्रातून जास्तीत जास्त खासदार निवडून आणण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. निवडणूक जरी लोकसभेची असली तरी परीक्षा मात्र भाजपच्या आमदारांची होणार आहे. कारण लोकसभेला ज्या मतदारसंघातून भाजपला मताधिक्य मिळणार नाही. त्या आमदारावर विधानसभेच्या तिकिटाचे गंडांतर येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

माळशिरसचे आमदार राम सातपुते यांना सोलापूर लोकसभेसाठी उतरवण्याच्या हालचाली सुरू आहेत. हा अंतिम निर्णय झाला नसला तरी त्यांचे नाव मात्र वरिष्ठ पातळीवरून चर्चिले जात आहे. मार्च-एप्रिलमध्ये होणारी लोकसभा निवडणूक जरी लोकसभेची असली तरी खरी परीक्षा मात्र आमदारांची ठरणार आहे.

नुकतेच केंद्रीय गृहमंत्री गणेशोत्सावात पुणे दौऱ्यावर होते. त्यावेळी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत त्यांची बैठक झाली. यामध्ये प्रत्येक विधानसभा मतदारसंघातून भाजपच्या लोकसभा उमेदवाराला मताधिक्य द्यावे, असे आदेश दिल्याची माहिती आहे. ज्या मतदारसंघातून लोकसभेला मताधिक्य मिळणार नाही, तेथील आमदाराचा विधानसभेचा मार्ग खडतर होणार आहे, अशी त्या बैठकीत चर्चा झाल्याची माहिती आहे.

सोलापूर लोकसभा मतदारसंघाचा विचार करता शहर उत्तरमधून आमदार विजयकुमार देशमुख, दक्षिणमधून आमदार सुभाष देशमुख, पंढरपूर-मंगळवेढामधून आमदार समाधान आवताडे, अक्कलकोटमधून आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची मोठी परीक्षा ठरणार आहे. या चारही आमदारांना आपापल्या मतदारसंघातून भाजपच्या उमेदवाराला मताधिक्य द्यावे लागणार आहे. २०१४ आणि २०१९ मध्ये मोदी लाटेत सोलापूर लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या सहाही विधानसभा मतदारसंघातून भाजपला मताधिक्य मिळाले होते. मात्र आता परिस्थिती बदललेली आहे. जरी सोलापूर लोकसभा मतदारसंघ भाजपला सोपा वाटत असला तरी अचानक काहीही होण्याची शक्यताही वर्तवण्यात येत आहे. सध्या काँग्रेस-सेना आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) यांची महाआघाडी आहे. भाजप उमेदवाराच्या विरोधात आ. प्रणिती शिंदे यांचे नाव चर्चेत जात आहेत. पराभवाची परतफेड करण्याची जोरदार तयारी काँग्रेसकडून सुरू आहे. त्यामुळे भाजपच्या चारही आमदारांना डोळ्यात तेल घालून निवडणुकीसाठी प्रचार करावा लागणार आहे.






**भाजप आमदार झाले सतर्क :** आगामी लोकसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर लोकसभा मतदारसंघात येणारे भाजपाचे चारही आमदार सतर्क झाले आहेत. सर्व आमदार सध्या विविध माध्यमातून जनसंपर्क वाढवत आहेत. या सर्वच आमदारांनी सेवा पंधरवड्याच्या निमित्ताने स्वच्छता अभियानात आपापल्या विधानसभा मतदारसंघात नागरिकांबरोबर संवाद साधला तसेच प्रत्येक मतदारसंघात भूमिपूजन आणि लोकार्पण सोहळे होताना दिसत आहेत.